**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५६/२०१७-१८/58 दिनांक: 17/03/2018

**आदेश**
**आदेश केस क्र. ५६ /२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| सौ सिमा शशीकांत सामनगडकर<br>५० श्रीनिधी महालक्ष्मीनगर, कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर<br><br>३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पश्चिम उपविभाग, कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

तक्रारदाराची थोडक्यात केस अशी की, तक्रारदाराने सि.स.क्र.६९४/३ अ , ए वॉर्ड जुना वाशी नाका शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे महानगरपालीकेकडून रीतसर परवानगी घेऊन निवासी व व्यापारी संकुल बांधलेले असून बांधकाम परिपूर्तीचा दाखला घेतला आहे.त्यास म.रा.वि.वि.कं.मर्या. कडून विद्युत पुरवठा घेतलेला आहे. सदर ठिकाणी इलेक्ट्रीकल्स ठेकेंदारामार्फत रीतसर मागणीप्रमाणे १०० के.व्ही.ए. ड्राय. टाईप रोहित्र विकत घेतलेला असून इतर एकत्रित कामे परवानगीने केली आहेत. सदर संकुलातील एकूण १९ व्यापारी व निवासी वीज कनेक्शन त्या संकुलातील व्यापारांना व घरांना दिलेली आहेत. ते सर्व ग्राहक ऑक्टोंबर २००६ पासून वीज बिले नियमित वेळोवेळी भरत आहेत. सुरवातीला सदर संकुलात ऑईल टाईप रोहित्र बसविण्यात आलेले होते. तथापी सहाय्यक संचालक नगर रचना कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडून सदर मिळकतीच्या हद्दी कायम करुन घेत असताना सदरचा ऑईल टाईप रोहित्र शेजारील मिळकतीत १ फूट सरकला असल्याने निदर्शनास आले.त्या नंतर तो रोहित्र तक्रारदारांच्या हद्दीत बसविणे संदर्भात वितरण कंपनीकडे अर्ज केला असता रोहित्र बसविण्यास तक्रारदारांची जागा अपुरी असल्याने त्या ऐवजी ड्राय टाईप रोहित्र बसविण्याच्यासुचना वीज वितरण कंपनीकडून तक्रारदारास करण्यात आल्या. त्यानुसार तक्रारदारांने १०० के.व्ही.ए चा ड्राय टाईप रोहित्र खरेदी केलेला असून सदरचा रोहित्र वितरण कंपनीकडे टेस्टींग करण्यास दिला असता सदरचा रोहित्र GTP Approval नसल्याचे कारणा वरुन त्याचे टेस्टींग करण्यास टेस्टींग डिव्हीजन ने नकार दिलेला आहे. ड्राय टाईप रोहित्र चे GTP Approved १०० KVA Transformer चा पुरवठादार महाराष्ट्रात कोणीही नाही. कमी जागेत रोहित्र बसवण्याचा असल्याने त्या ठिकाणी ड्राय टाईप रोहित्र बसविणे आवश्यक आहे. सबब तक्रारदाराने खरेदी केलेला ड्राय टाईप रोहित्र टेस्टिंग करुन द्यावा व तो पर्यन्त वीज वितरण कंपनीने तक्रारदाराच्या वीज पुरवठा खंडीत करु नये. असे आदेश व्हावेत अशी तक्रारदाराची मागणी आहे.

जाबदार विद्युत वितरण कंपनीने हजर राहून आपले लेखी म्हणणे या कामी हजर केलेले आहे. तक्रारदाराने ज्या Facts आपल्या तक्रार अर्जात नमुद केल्या आहेत, त्या सर्व मान्य केल्यानंतर विद्युत वितरण कंपनीचे कथन असे आहे की, विधी सल्लागार, कोल्हापूर मंडल, कोल्हापूर यांनी आपले दिनांक २८.०१.२०१८ चे पत्रान्वये तक्रारदार यांनी विकत घेतलेला ड्राय टाईप रोहित्राचे १ महिन्याच्या अवधीत GTP Approval करुन घ्यावेत असा आदेश दिलेला असून त्यानुसार तक्रारदाराने कंपनीने हमीपत्र देखील सादर केले आहे. GTP Approval नसल्याने सदर ड्राय टाईप रोहित्राचे टेस्टिंग प्रलंबित आहे. तक्रारदाराने विकत घेतलेला रोहित्र GTP Approval च्या यादीत नाही. तसे तक्रारदारास दिनांक २८.१२.२०१७ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. तथापी तक्रारदाराचा विज पुरवठा हा दुस-या रोहित्रावरुन तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २४.१०.२०१४ पासून चालू करुन दिला आहे. तसेच अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष कोल्हापूर यांच्या आदेशाप्रमाणे तक्रारदारास विद्युत पुरवठा सुरु आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी आज रोजी मंचा समोर घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारांच्या वतीने त्यांचे चिरंजीव केदार शशीकांत सामानगडकर तर विद्युत वितरण कंपनी तर्फे कार्यकारी अभियंता श्री सुनिल माने , शहर विभाग, कोल्हापूर हे हजर होते.

उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर त्यांचा वाद कायम स्वरुपी मिटविण्या संदर्भात मंचाने त्यांच्यात तडजोड करण्याचा प्रयत्न केला. विद्युत वितरण कंपनी तर्फे या मंचासमोर असे निवेदन करण्यात आले की, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा निवाडा होण्याच्या आधीपासून तक्रारदारांना दुस-या रोहित्र वरुन सदर संकुलाचा विज पुरवठा करण्यात आलेला असून त्या विज पुरवठयामुळे कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होत नाही. ज्या अर्थी इतर दुस-या रोहित्रा वरुन तक्रारदारांच्या संकुलाचा वीज पुरवठा चालू आहे. त्या अर्थी सदर संकुलात स्वतंत्र रोहित्र बसविणेची आवश्यकता नाही.

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO.

त्यामुळे तक्रारदरांना सध्या ज्या रोहित्रा मधून वीज पुरवठा करण्यात येत आहे. तसाच कायम स्वरुपी वीज पुरवठा करणेत हरकत नाही. तथापी तक्रारदारांनी आहे तो Load(भार) कायम ठेवावा त्यात वाढ करु नये अशी सुचना विद्युत वितरण कंपनीच्या अधिका-याकडून करण्यात आली. त्यास तक्रारदाराने संमती दिलेली आहे.

वरील सर्व निवेदनांच्या आणि GTP Approval Dry Transformer १०० KVA चा मिळू शकत नसलेने हा मंच खालील आदेश देत आहे

**<u>आदेश</u>**

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराच्या सदर संकुलास सध्या सुरु आसलेला तात्पुरता वीज पुरवठा कायम स्वरुपी करण्यात यावा असा आदेश देत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.